# Cultural Committee Report 2014-15

मा. सु. पा. कला, विज्ञान व कै. पां. ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा जि. वाशिम.

## मानोरा तालुक्यातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा

## सत्कार समारंभ

सत्र - २०१४ - २०१५

## कार्यक्रम अहवाल

आयोजक

सांस्कृतिक समिती
मा. सु. पा. महाविद्यालय, मानोरा

संयोजिका

प्रा. कु. आर. ए. नक्षिणे

सदस्य

प्रा. एच. एल. चव्हाण | प्रा. पी. डी. राऊत | प्रा. एस. ए. बोके

विद्यार्थी प्रतिनिधी

आशिष तळणे
बी. ए. भाग ३

कु. माधवी पाटील
बी. ए. भाग १

प्रति,
प्राचार्य,
मा. सु. पा. कला, विज्ञान व कै. पां ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा.
ता. मानोरा, जिल्हा. वाशिम.

विषय :- तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत,

अहवाल सादर करणार :- प्रा. कु. आर. ए. नक्षिणे (संयोजिका, सांस्कृतिक समिती )

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास दिनांक २१ जुलै २०१४ रोजी महाविद्यालयात आयोजित केलेल्या तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाची संपुर्ण माहीती अहवाल स्वरूपात आपणास सादर करत आहो.

करीता आपल्या माहीतीस्तव सादर

स्थळ :- मानोरा
दिनांक :- २५ जुलै २०१४

संयोजिका
प्रा. कु. आर. ए. नक्षिणे
सांस्कृतिक समिती, मा. सु. पा. महा. मानोरा
सदस्य :- १) प्रा. एच. एल. चव्हाण
२) प्रा. पी. डी. राऊत
३) प्रा. एस. ए. बोके

कार्यक्रमाची माहीती :-

आपल्या महाविद्यालयात दिनांक २१ जुलै २०१४ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला तालुक्यातील विविध शाळांमधिल विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन ज्ञा. शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष श्री. अरविंदभाऊ इंगोले, प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मा. पाटील साहेब, तहसिलदार मानोरा, प्रमुख पाहुणे म्हणुन ज्ञा. शि. प्र. सस्थेचे संचालक मा. मोतीरामजी ठाकरे व सचिव मा. महादेवरावजी ठाकरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे हे उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थी अतिशय परिश्रमाने व संकटावर मात करीत गुणवत्ता सिध्द करतात. तेव्हा आई-वडील, समाज आणि गुरूजनांचा अभिमान वाढतो. व त्यांच्या केलेल्या कार्याचा गुणगौरव केल्यास त्यांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढतो. याच कारणाने आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या दृष्टिने आपण तालुक्यातील विविध विद्यालयातील आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार घेत असतो.

या कार्यक्रमात तालुक्यातील एकुण २५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये वर्ग १० वीचे ०६ विद्यार्थी आणि वर्ग १२ वीचे २२ विद्यार्थी समाविष्ट झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शिकत असतांना कोणकोणत्या बाबी अंगिकाराव्यात, अभ्यासाचे नियोजन कशा रितीने करावे, या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. संजय बोके यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. एच. एल. चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमात बक्षिस वितरणाची जबाबदारी प्रा. एच. एल. चव्हाण व प्रा. एस. ए. बोके यांनी तर बक्षिस वितरण करतांना प्रा. डी. जी. मोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. कु. आर. ए. नक्षिणे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.

अशा प्रकारे हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता महाविद्यालयातील सर्व कर्मचा-यांनी मोलाचे सहकार्य केले. व वरिल प्रमाणे हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

सत्कार समारंभात उपस्थित विद्यार्थ्यांची माहीती

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | वर्ग | शाळेचे / महाविद्यालयाचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कु. मोनाली बाबाराव विघे | १२ वा विज्ञान | मा. सु. पा. महा. मानोरा | ७७ % |
| २ | प्रिवेश दयाशंकर कुर्मी | १२ वा विज्ञान | मा. सु. पा. महा. मानोरा | ७५ % |
| ३ | कु. प्रियंका महादेव जामदार | १२ वा विज्ञान | मा. सु. पा. महा. मानोरा | ७४ % |
| ४ | कु. प्रिती भावसिंग जाधव | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ८५ % |
| ५ | अमोल दिलीप भगत | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ८२ % |
| ६ | कु. प्रतिभा आनंदराव जाधव | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ८० % |
| ७ | अक्षय अरूण गवई | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७९ % |
| ८ | कु. राधिका राजेश्वर रोकडे | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७८ % |
| ९ | कु. अंकीता विश्णू राठोड | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७८ % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | आकाश सुभाष गजभार | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७८ % |
| ११ | कु. अश्विनी पुरूषोत्तम राऊत | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७७ % |
| १२ | लखन नामदेव चव्हाण | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७७ % |
| १३ | अजय उदयसिंग चव्हाण | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७६ % |
| १४ | कु. पुजा भिमराव राठोड | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७६ % |
| १५ | विक्रम दिलीप राठोड | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७५ % |
| १६ | कु. जयश्री विनोद गावंडे | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७५ % |
| १७ | कृष्णा अवधूत गावंडे | १२ वा कला | मा. सु. पा. महा. मानोरा | ७५ % |
| १८ | रंजीत झोडगे | १२ वा कॉमर्स | मा. सु. पा. महा. मानोरा | ७८ % |
| १९ | कु. पुष्पा वानखडे | १२ वा कॉमर्स | मा. सु. पा. महा. मानोरा | ७७ % |
| २० | कु. करूणा जामनिक | १२ वा कॉमर्स | मा. सु. पा. महा. मानोरा | ७२ % |
| २१ | ओम श्रीकांत दहापूते | १२ वा एचएससीव्ही. | मा. सु. पा. महा. मानोरा | ७८ % |
| २२ | कु. नबिला महेविश जमिलोध्दिन | १२ वा कला | रहेमानिया उर्दू हाय. मानोरा | ७१.६९ % |
| २३ | मो. फैजान मो. इक्बाल शेख | १० वा | ------------- \|\| ---------- | ९१ % |
| २४ | सुमय्या समरिन शब्बीर खान | १० वा | ------------- \|\| ---------- | ८७.६० % |
| २५ | कु. गौरी दत्तात्रय ठोंबरे | १० वा | शिवाजी हायस्कुल. केनवड | ८६ % |
| २६ | कु. राखी रमेशराव गावंडे | १० वा | के. एल. देशमुख विद्या. कारखेडा | ९०.८० % |
| २७ | कु. मयुरी गजानन सोळंके | १० वा | ------------- \|\| ---------- | ८७.२० % |
| २८ | कु. कोमल काशीनाथ गावंडे | १० वा | ------------- \|\| ---------- | ८५ % |

संयोजिका

प्रा. कु. आर. ए. नक्षिणे

सांस्कृतिक समिती.

प्राविण्यप्राप्त विद्यार्थी सत्कार समारंभाच्या छायाप्रती





प्राविण्यप्राप्त विद्यार्थी सत्कार समारंभाच्या छायाप्रती





प्राविण्यप्राप्त विद्यार्थी सत्कार समारंभाच्या छायाप्रती





प्राविण्यप्राप्त विद्यार्थी सत्कार समारंभाच्या छायाप्रती





प्राविण्यप्राप्त विद्यार्थी सत्कार समारंभाच्या छायाप्रती





# Cultural Committee Report 2015-16



सांस्कृतिक समितीच्या कार्याचा अहवाल
(शैक्षणिक सत्र 2015-16)

प्रती
प्राचार्य साहेब
मा. सु. पा. महाविद्यालय, मानोरा

विषय :- शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक समीतीने केलेल्या कार्याचा अहवाल सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती की शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक समितीने खालील प्रमाणे कामकाज केले आहे. त्याची तपशिलवार माहीती पुढील प्रमाणे देण्यात आहे.

1) **गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार** :- माहे जून 2015 मध्ये मानोरा तालुक्यातील एस.एस.सि व एच.एस.सि. परिक्षेमध्ये विशेष गुण घेउन उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तालुकास्तरिय सत्कार सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमात तालुक्यातील विविध शाळेतील एकूण 84 विद्यार्थी उपस्थित झाले होते. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. अरविंदभाऊ इंगोले, हे होते. त्याच प्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अशोकराव देशमुख उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा लाड, आणि प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांनी आपली उपस्थिती दर्शवुन गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहीत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. जे. एन. कांबळे यांनी केले तर संचालन प्रा. एस. व्हि. बोके यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनाची जबाबदारी प्रा. एस. ~~व्हि.~~ रिठे यांनी पार पाडली.

2) **शाहु महाराज जंयती निमित्य तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धा** :- पंचायत समीती शिक्षण विभाग व महाविद्यालयाची सांस्कृतीक समीती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या

सभागृहामध्ये 26 जून 2015 रोजी "छत्रपती शाहू महाराजांचे कार्य" या विषयावर तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभाग दर्शविला. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. थकरे हे होते. त्याचप्रमाणे प्रमुख अतिथी म्हणून मडावी साहेब बि. ई. ओ. पं. स. मानोरा व श्री. ठाकरे साहेब विषयतज्ञ डायट जि. प. वाशिम हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संयोजक प्रा. जे. एन. कांबळे यांनी केले. आभारप्रदर्शनाची जबाबदारी प्रा. व्हि. आर. भगत यांनी पार पाडली. या स्पर्धेस एकुण 18 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी कु. मोनीका विनोद ठाकरे, कु. अश्वीनी रेणुकादास राठोड, हरिष गावंडे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय व तृतिय क्रमांक पटकावला.

3/ <u>क्रांती दिना निमित्य निबंध स्पर्धा</u> :-> ऑगस्ट क्रांती दिना निमित्य सांस्कृतिक समीतीने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. कनिष्ट विभागाची जबाबदारी प्रा. एस. व्हि. बोके यांनी पार पाडली तर वरिष्ट विभागाची जबाबदारी प्रा. जे. एन. कांबळे यांनी पार पाडली. या निबंध स्पर्धेस वरिष्ट महाविद्यालयातील एकुण 06 विद्यार्थ्यांनी क्रांतीकारकांच्या जिवनकार्यावर निबंध लिहले. यापैकी कु. श्रद्धा अशोक शेळके बि. ए. भाग 2 या विद्यार्थीनिनी प्रथम क्रमांक पटकविला तर द्वितीय क्रमांक कु. आश्विनी रमेश तायडे बि. ए. भाग या विद्यार्थीनिनी पटकविला.

4/ <u>सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील सहभाग</u> :->
ऑक्टो - 2015 मध्ये जि. एस. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव या ठिकाणी सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाने "युवा महोत्सव" आयोजीत केला होता. या युवामहोत्सवामध्ये आपल्या महाविद्यालयानी दोन events मध्ये सहभाग घेतला होता. लोकनृत्य - 06 व वक्तृत्व स्पर्धा - 02 एकुण 08 विद्यार्थ्यांनी

5) **स्वंयशासन दिन :->** 5 सप्टे 2015 रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात "स्वंयशासन दिन" साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये सर्व महाविद्यालय विद्यार्थ्यांनी चालविले. विशेषतः विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयाचे अध्यापन कार्य केले. या अध्यापन कार्यामध्ये बि.ए. 12, बि.कॉम - 11 व बि.एस.सि. 16 असा एकुण 39 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी शाखा निहाय निरिक्षण करुन उत्कृष्ट अध्यापन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

**कला शाखा** प्रथम :- सचिन हरसुले बि.ए. भाग 3
द्वितिय :- सागर ऐडूतकर बि.ए. भाग 2
तृतिय :- कु. मोनाली जाधव बि.ए. भाग 3

**वाणिज्य शाखा** प्रथम :- उमेश जाधव बि.कॉम. भाग 1
द्वितिय :- कु. नम्रता पाटील —"—
तृतिय :- प्रफुल्ल डेरे —"—

**विज्ञान शाखा** प्रथम :- निलेश ठाकरे बि.एस.सि. भाग 2
द्वितिय :- अक्षय पवार बि.एस.सि. भाग 1
तृतिय :- निलेश शिंदे बि.एस.सि. भाग 3

अशा प्रकारे वरील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहीत करण्यात आले होते.

6) **26 नोव्हें 2015 संविधान दिन :->** 26 नोव्हे 2015 रोजी शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारतीय संविधानाची उद्देशपत्रीकेच्या वाचनाचा सामुहीक कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संयोजक प्रा. जे.एन. कांबळे यांनी केले. तर संविधानाची उद्देशपत्रीका प्रा. के.एम. मुळे यांनी वाचून दाखविली व उपस्थित विद्यार्थ्यांकडून ती म्हणून घेतली. शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एस. ठाकरे यांनी संविधानाचे महत्व सांगितले.

7) <u>व्याख्यान माला</u> :-> महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्य 12 जाने ते 14 जाने या कालावधीत तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजीत करण्याचे ठरले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे 2 व्याख्याने वेळेवर रद्द झाले. त्यामुळे 12 जाने 2016 रोजी डॉ. रमाकांत कोलते माजी मराठी विभाग प्रमुख अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ यांचे " युवकांचे भवितव्य " या विषयावर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये व्याख्यान झाले. अशा प्रकारे एकच व्याख्यान झाले. पण ते उत्कृष्ट होते. विद्यार्थ्यांचा यास भरपूर प्रतीसाद मिळाला.

8) <u>महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या</u> :-> शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये महाविद्यालयामध्ये नियोजनामध्ये नमूद केलेल्या सर्व महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजऱ्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे सुट्टयामध्ये आलेल्या काही जयंत्या व पुण्यतिथ्या मी संयोजक म्हणून स्वतः महाविद्यालयात येऊन साजऱ्या केलेल्या आहेत.

9) "<u>सायबर क्राईम</u>" <u>कार्यशाळा</u> :-> फेब्रु 2016 मध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा लाड, वाघमारे साहेब ठाणेदार पोलीसस्टेशन, मानोरा व इतर पोलीस अधिकाऱ्यांनी "सायबर क्राईम" या विषयावरील कार्यशाळे मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेचे संचालन सांस्कृतिक समीतीने केले होते. कार्यशाळेला जवळपास 250 विद्यार्थी उपस्थित असून, पोलीस अधिकाऱ्यांनी Power point Presentation च्या माध्यमातून Internet च्या युगात कशा प्रकारे गुन्हे घडतात या विषयीची विद्यार्थ्यांना माहीती दिली. या संदर्भात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नाची उत्तरे संबधीत पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

## 10) बाहेर ठिकाणी पाठविलेल्या विद्यार्थ्यांची माहिती

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | स्पर्धेचे ठिकाण | पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1) | वक्तृत्व स्पर्धा | अकोला | 02 |
| 2) | स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा पाणिपुरवठा व स्वच्छता विभाग प.स. मानोरा | एल. एस. पी. एम. क. महा. धामणी | 10 |
| 3) | नेहरू युवा केन्द्र वाशिम द्वारा आयोजित वक्तृत्व स्पर्धा (तालुका स्तर) | अप्पास्वामी महाविद्यालय, शेंदूरजना आढाव | 04 |
| 4) | नेहरू युवा केन्द्र द्वारा आयोजीत वक्तृत्व स्पर्धा (जिल्हास्तर) | आर्य कॉलेज वाशिम | 01 |

वरील स्पर्धे पैकी स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील तिन विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे रोख बक्षीसे मिळालेली आहेत.

① कु. विजेता भिमराव जाधव 5000 रु.
② कु. गिता रमेश गव्हाणे 3000 रु.
③ कु. माधवी धनंजय पाटील 2000 रु.

एकूण = 10,000 रुपयाची बक्षीसे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पटकावलेली आहेत.

अशा प्रकारे शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक विभागाने आपले कार्य केलेले आहे. तरि हा अहवाल स्विकृत करावा हि विनंती

स्थळ :- मानोरा
दिनांक :- 20/04/2016

आपला विश्वासु
संयोजक
(प्रा. जे. एन. कांबळे)



तालुका स्तरिय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यातील अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतांना मा. अरविंद भाऊ इंगोले (अध्यक्ष ग्रा. शि. संस्था मानोरा)



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी श्री. अशोकराव देशमुख उपविभागीय पोलीस अधिकारी संबंधी त्यांचा सत्कार करतांना.



तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचे एकत्रित छायाचित्र.



तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे प्रास्ताविक करताना संयोजक प्रा. जे. ह. कांबळे



तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे संचालन करताना संयोजक प्रा. जे. ह. कांबळे



तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थीनी चे छायाचित्र



राजर्षी
छत्रपती
शाहू महा-
राजांच्या
जयंती
निमित्य
आयोजीत
केलेल्या
"तालुका
स्तरिय
वक्तृत्व
स्पर्धेच्या
अध्यक्षस्थान
वरून मार्गद
करताना" प्राच
डॉ. एन. एस. ठ



तालुका
स्तरिय
वक्तृत्व
स्पर्धेतील
उपस्थिती
ही दर्शविणा
छायाचित्र



वक्तृत्व
स्पर्धेत
पारितोषिक
पटकाविणा
विद्यार्थीला
पारितोषीक
देऊन सन्मा
करताना
प्राचार्य
डॉ. एन. एस
ठाकरे



सं.गा.ब. विद्यापीठाच्या युवामहोत्स- वा मध्ये लोकनृत्य सादर करतांनाचे छायाचित्र.



लोकनृत्य



लोकनृत्यात सहभागी झालेली चमू व्यवस्थाप[illegible] व सहभागी कलाकारा- सह



सं. गा. अ.
विद्यापीठाच्या
खामगाव
येथिल
युवामहोत्सवा
तील वक्तृत्व
स्पर्धेत
भाग घेताना
शंतनु ठाकरे
बि. कॉम.
भाग 2



गुणवंत
विद्यार्थ्यांचा
सत्कार
करताना
मा. अरविंद
- भाऊ ठाकरे
अध्यक्ष
ज्ञानोपासक
शि. संस्था
मानोरा.



गुणवंत
विद्यार्थ्यांच्या
सत्कार
सोहळ्याला
मार्गदर्शन
करताना
प्राचार्य
डॉ. एन. एस.
ठाकरे.



5 सप्टें 2015
शिक्षक दिना निमित्त आयोजित केलेल्या स्वयंशासन उपक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना शिकविताना कु. गीता जाधव बि.ए. भा. 3



स्वयंशासन उपक्रमात शिकविताना विद्यार्थी




"शिवजयंती" निमित्त छ. शिवाजी यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करतांना संयोजक प्रा. जे. एन. कांबळे.



सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला "अभिवादन" करतांना



महात्मा
गांधीच्या
जयंती
निमित्त
त्यांच्या
प्रतीमेस
पुष्पहार
अर्पण
करतांना
क.पि.वृ.
प्रा. इंगोले
सर.



संत गाडगे बाबांच्या
प्रतीमेस पुष्पहार
अर्पण करतांना
प्रा. सोपान इंगोले

सांस्कृतिक विभागाने आयोजीत केलेल्या उपक्रमांच्या वर्तमान पत्रातील प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे.

# स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा उत्साहात

मानोरा: पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग पंचायत समिती मानोराद्वारा स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा एल.एस.पी.एम. हायस्कूलच्या सभागृहात पार पडली. यावेळी अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे उपसभापती अभिजीत पाटील, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी गटविकास अधिकारी गुलाबराव राठोड, प्रभारी गटशिक्षणाधिकारी अनिल पवार, मुख्याध्यापक अरुण खुपसे, विस्तार अधिकारी बी.ए. अवगण, व्यवहारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना गुलाबराव राठोड म्हणाले की, युवा पिढीने पुढे येवून स्वच्छतेबाबत गावागावात जास्तीत जागृती निर्माण करावी. या वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन तरुणांना वाव मिळेल व हे तरुण समाजात त्यांचा प्रसार करतील. स्वच्छता विभागाचे समूह समन्वयक आकाश मनवर यांनी या स्पर्धेबाबत माहिती सांगितली. कनिष्ठ महाविद्यालयीन गट व वरिष्ठ महाविद्यालयीन गट या दोन गटात ही स्पर्धा झाली. एकूण २५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. तरुणाईच्या हाती स्वच्छतेच्या ज्योती, माझ्या स्वप्नातील स्वच्छ निर्मल गाव, व्यास स्वच्छ महाराष्ट्राचा प्रवास आव्हानाचा, आपले गाव, आपली योजना, आदी विषय वक्तृत्व स्पर्धेचे होते. या स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक प्रभानंद दत्ता उधित, द्वितीय क्रमांक मायधी धनंजय पाटील, तृतीय क्रमांक गीता रमेश गव्हाणे यांनी पटकावला.



मानोरा : जनजागृती अभियानात बोलताना मान्यवर. (सकाळ छायाचित्रसेवा)

# मासुपा विद्यालयात सोशल मीडिया जनजागृती अभियान

मानोरा, ता. १ : मा. सु. पा. महाविद्यालयात पोलिस स्टेशनअंतर्गत सोशल मीडिया जनजागृती अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन. एस. ठाकरे हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डी.वाय.एस.पी. खाले, उपविभागीय पोलीस अधिकारी रत्नाकर नवले, मानोरा ठाणेदार कुंदनकुमार वाघमारे उपस्थित होते. यावेळी श्री. नवले बोलताना म्हणाले की, भारतीय संस्कृतीत स्त्रीला देवीचा दर्जा दिलेला आहे. त्यामुळे ती कोणत्याही जाती धर्मांची असो तिचा मानसन्मान करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. परंतु काही कुबुद्धी लोक तरुणांचा गैरवापर करून त्यांच्याकडून अपराध घडवून त्यांना अडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरुणांनी नुकतेच बाजारात आलेल्या 'व्हॉट्सअॅप', फेसबुक यासारख्या गोष्टींसाठीच वापर करावा. तरुणांनी वाईट लोकांशी संगत करून आपले आयुष्य खराब केल्यापेक्षा अभ्यास करून आपले भविष्य घडवून आईवडिलांची सेवा करावी, व समाजात मानाचे स्थान मिळवावे असे प्रतिपादन ते म्हणाले.

पुढे बोलताना नवले म्हणाले की, मुली व स्त्रियांना पाठलाग करणे, त्यांच्याकडे बघून अश्लील चाळे करणे कायद्याने गुन्हा आहे. तसेच त्यांना फेसबुक, व्हाट्सअॅप वर वाईट संदेश पाठविणेही कायद्याने गुन्हा आहे. त्याकरीता त्या व्यक्तीला तुरुंगवास सुद्धा होऊ शकतो. आपल्या वागण्याने इतरांना त्रास होईल तसेच आपल्या आईवडिलांची मान शरमेने खाली झुकेल असे कृत्य करू नये. अशी अनेक उदाहरणे देवून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. तसेच ठाणेदार वाघमारे यांनी सुद्धा आपल्या भाषणात वाईट संगतीमुळे आपले कसे नुकसान होते हे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन जे. एन. चौधरी यांनी केले, तर आभार संजय शेटे यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**Cultural Committee Report 2016-17**

मा.सु.पा. कला,विज्ञान व कै .पां.ठा. वाणिज्य महा.

ता. मानोरा जि. वाशिम

# सांस्कृतिक समितीच्या कार्याचा अहवाल

शैक्षणिक सत्र २०१६ - १७

*सादरकर्ता*

**प्रा.डॉ. जयवंत कांबळे**

संयोजक,

सांस्कृतिक समिती

A

# सांस्कृतिक समितीच्या कार्याचा आढावा
# (शैक्षणिक सत्र २०१६ - १७)

प्रति,

प्राचार्य साहेब,
मा.सु.पा. महाविद्यालय, मानोरा

विषय :- शैक्षणिक सत्र २०१६ - १७ मध्ये सांस्कृतिक समितीने केलेल्या कार्याचा अहवाल सादर करणेबाबत.

सादरकर्ता :- प्रा. डॉ. जयवंत कांबळे (संयोजक सांस्कृतिक समिती)

महोदय,

वरिल विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती की, शैक्षणिक सत्र २०१६ - १७ मध्ये सांस्कृतिक समितीने खालीलप्रमाणे कामकाज केले आहे. त्याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## १) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :-

माहे जुलै २०१६ मध्ये मानोरा तालुक्यातील एस.एस.सी., एच.एस.सी. व राज्य सेवा आयोगाच्या परिक्षेमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा तालुकास्तरीय सत्कार सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. या सत्कार सोहळयासाठी मानोरा तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयामधून एकूण ७४ विद्यार्थी उपस्थित झाले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. अरविंदभाऊ इंगोले हे होते. त्याच प्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. नवले साहेब व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. गणेश मालटे हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस. ठाकरे हे सुध्दा या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. जे.एन. कांबळे यांनी केले तर संचालन प्रा.एस.पी. रिठे यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनाची जबाबदारी प्रा. भगत यानी पार पाडली.

## २) निबंध स्पर्धा :-

माहे ऑगस्ट मध्ये वरिष्ठ व कनिष्ठ विद्यार्थी गटासाठी क्रांती दिनाचे औचित्य साधून क्रांतीकारकांच्या जिवनावर आधारीत निबंध स्पर्धेचे आयोजन

करण्यात आले होते. या स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण १२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यापैकी योगेश दशरथ कुऱ्हे बि.ए. भाग ३, कु. राधिका रोकडे बि.ए.भाग ३, अमोल भगत बि.ए. भाग ३ यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

३) पथनाट्य :-

माहे ऑगस्ट मध्ये स्वाध्याय परिवारांच्या नाट्य कलावंतांनी महाविद्यालयामध्ये भारतीय धर्म व सांस्कृतिक मुल्यांवर आधारीत जवळजवळ दिड तासाचे पथनाट्य सादर केले. या पथनाट्याला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

४) दैनिक सकाळच्या निबंध स्पर्धेतील सहभाग :-

पर्यावरण संतुलनाच्या बाबतीत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून दैनक सकाळ माध्यम समुहाच्यावतीने दि. २ सप्टेंबर २०१६ रोजी पर्यावरण रक्षणात वृक्षसंवर्धनाचे महत्व या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकूण १७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग दर्शविला होता.

५) स्वयंशासन दिन :-

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दीन हा स्वयंशासन दिन म्हणून महाविद्यालयामध्ये राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या विषयाच्या तासिका घेतल्या. या उपक्रमामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. जवळजवळ ४० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

६) सं.गा.बा. अमरावती विद्यापिठाच्या युवा महोत्सवातील सहभाग :-

माहे सप्टेंबर २०१६ मध्ये चिखली जि. बुलढाणा या ठिकाणी सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाने युवा महोत्सव आयोजित केला होता. या युवा महोत्सवामध्ये आपल्या महाविद्यालयातील एकूण १७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. लोकनृत्य ०९, इंडियन ग्रुप (समुह गान) ०६, वक्तृत्व स्पर्धा ०१, वादविवाद स्पर्धा ०२, अशा प्रकारचा आपल्या महाविद्यालयाचा विविध कला प्रकारामध्ये सहभाग होता.

७) एकपात्री नाट्य प्रयोगाचे आयोजन :-

मराठी चित्रपटामधून विविध भुमिका साकारणारे सिने कलावंत श्री. अनिल ओव्हळ कोल्हापूर यांचा दि. १० डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये धर्म या विषयावर एकपात्री प्रयोग झाला. या नाट्य प्रयोगाला विद्यार्थ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला.

८) मतदार जागृती अभियानातील सहभाग :-

महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाचे व सांस्कृतिक समितीचे सदस्य प्रा. एस.पी. रिठे यांना आपले काही विद्यार्थी घेउन मानोरा परिसरातील मतदारांना जागृत करण्याच्या उपक्रमा

९) वाचन प्रेरणा दिन :-

१५ ऑक्टोंबर २०१६ रोजी डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलामच्या जयंती दिंनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये प्रा. आर.व्ही. इंगोले मॅडमने संत ज्ञानेश्वराच्या पसायदानाचे सामुहिक वाचन केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील अग्रलेख, पुस्तकातील महत्वाची अवतरणे इत्यादींचे वाचन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाने केले होते. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा बराच सहभाग होता.

१०) व्याख्यान माला :-

महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती ते राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती या कालावधीत मातृसप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी तज्ञ व्यक्तींची व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. शैक्षणिक सत्र २०१६ - १७ मध्ये डॉ. उध्दव जाणे प्राचार्य कला महाविद्यालय कामरगांव व प्रा. रासेकर यशवंत महाविद्यालय मंगरुळपीर यांची दोन दिवशिय व्याख्यान माला महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. डॉ. उध्दव जाणे यांचे सावित्रीबाई फुले व स्त्रि शिक्षण व प्रा. रासेकर यांचे युवकांचा आत्मविकास या विषयावर अतिशय चांगली व्याख्याने झाली.

११) महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या :-

शैक्षणिक सत्र २०१६ - १७ मध्ये सांस्कृतिक समितीच्या नियोजनामध्ये नमुद केलेल्या सर्व महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन साजऱ्या करण्यात आल्या. सुट्टीच्या कालावधीत आलेल्या काही जयंत्या व पुण्यतिथ्या संयोजक या नात्याने मी स्वतः महाविद्यालयामध्ये जाउफन साजऱ्या करण्यात आल्या आहेत.

१२) युवा विकास चर्चासत्र :-

श्रम विकास परिषद महाराष्ट्र द्वारा युवा परिवर्तन यात्रा वाशिम ते सेवाग्राम वर्धा या दरम्यानच्या प्रवासामध्ये दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी श्रमविकास परिषदेचे अध्यक्ष श्री. घुईखेडकर व त्यांचे सर्व पदाधिकाऱ्यानी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत युवा विकास या विषयावर चर्चासत्र घडवून आणले होते. सध्यास्थितीत वाढत चाललेली बेरोजगारी हि भारतीय युवकांसाठी चिंतेची बाब आहे. त्यामुळे आजच्या युवकांनी स्वयंरोजगार निर्मितीकडे वळले

पाहिजे, नाही तर येणारा काळ हा युवकांना रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने फारसा चांगला राहणार नाही. अशा प्रकारचे विचार श्री. घुईखेडकर यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रात भाग घेउन संबंधितांना काही प्रश्न विचारले.

## ❋ बाहेर ठिकाणी पाठविलेल्या विद्यार्थ्यांची माहिती :-

| अ.क्र. | स्पर्धेचे नांव | स्पर्धेचे ठिकाण | पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०१ | वक्तृत्व स्पर्धा (स्वच्छता मित्र) वक्तृत्व करंडक स्पर्धा महाराष्ट्र शासन | एल.एस.पी.एम. कनिष्ठ महा. धामणी | ०४ |
| ०२ | वक्तृत्व स्पर्धा | रिसोड | ०१ |
| ०३ | वक्तृत्व स्पर्धा जिल्हा स्तर स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा | वाशिम | ०२ |
| ०४ | स्वामी विवेकानंदाचे विचार आजचा युवक एक दिवशीय कार्यशाळा | मंगरुळपीर | ०८ |

वरिल स्पर्धेमपैकी स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेमध्ये (तालुकास्तर) आपल्या महाविद्यालयातील तिन विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे रोख बक्षीसे मिळाली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | योगेश दशरथ कुऱ्हे | ५००० रु. |
| २) | कु. राधिका रोकडे | ३००० रु. |
| ३) | आकाश गजभार | २००० रु. |
| | एकुण | १००० रुपयाची बक्षिसे |

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पटकावले आहेत.

अशाप्रकारे शैक्षणिक सत्र २०१६-१७ मध्ये सांस्कृतिक समितीने कार्य केले आहे. तरी हा अहवाल स्विकृत कराल, हि विनंती.

दिनांक : २८/४/२०१७
स्थळ : मानोरा

संयोजक
सांस्कृतिक समिती,

# सांस्कृतिक समितीने घेतलेल्या विविध उपक्रमांच्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या बातम्यांची कात्रणे

## 'विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची कास धरावी'



मानोरा : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर.

## स्पर्धा परिक्षेत यशस्वी श्रीराम राठोड यांचा गौरव



## व्याख्यानमाला व वाचन प्रेरणा दिनानिमित्य घेतलेल्या विविध उपक्रमाच्या बातम्या

### मा.सु.पा.महाविद्यालयात व्याख्यान संपन्न

तालुका प्रतिनिधी । १२ जानेवारी

मानोरा : स्थानिक मानोरी सुभद्राबाई पाटील कला विज्ञान व के. पाटील [illegible] महाविद्यालय मानोरा [illegible] सांस्कृतिक समितीच्यावतीने [illegible] जानेवारी २०१७ रोजी [illegible] ... १२ जानेवारी २०१७ रोजी राष्ट्रमाता जिजाबाई व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंद आणि युवकांच्या [illegible] प्रा. एस.बी. [illegible] महाविद्यालय [illegible] व्याख्यान होते.

[illegible] प्राचार्य डॉ. [illegible] यांनी [illegible] विद्यार्थ्यांनी [illegible] केले.

[illegible] प्रा. [illegible] यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता केली. [illegible] महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समिती व महाविद्यालयातील [illegible] शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### वाचन प्रेरणा दिन साजरा

तालुका प्रतिनिधि / १८ ऑक्टोबर

मानोरा : मानोरी सुभद्राबाई पाटील महाविद्यालय मानोरा येथे १५ या दिवशी भारतरत्न व भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईलमॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व ग्रंथालय विभागाच्यावतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन.एस. ठाकरे हे उपस्थित होते. प्रथम मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. जे.एन. [illegible] यांनी केले. [illegible] प्रा. [illegible] इत्यादी [illegible] विशेष उपस्थिती [illegible] डॉ. [illegible] सर, [illegible] प्रा. एन.ए. [illegible] यांची होती. कार्यक्रमात, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, अभिवाचन, [illegible] इत्यादी साहित्याचे वाचन घेण्यात आले होते.

प्रथम प्रा. किशोर [illegible] यांनी [illegible] कविता [illegible] विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापल्या [illegible] साहित्याचे वाचन केले. या स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाले. कार्यक्रमाला प्रा. के.एम. [illegible], प्रा. [illegible], प्रा. एम.पी. [illegible], प्रा. पि.एन. [illegible], प्रा. डॉ. अविनाश [illegible], प्रा. एस.डी. [illegible], प्रा. डॉ. [illegible], प्रा. [illegible] आदी प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्य घेतलेल्या कार्यक्रमाच्या बातम्या

## मानोरा तालुक्यात लोकमान्य टिळक जयंती



मानोरा : लोकमान्य टिळक जयंतीप्रसंगी उपस्थित विद्यार्थी.



व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफतांना प्राचार्य डॉ. उध्दव जाणे



युवाशक्ती चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करतांना श्रम विकास परिषदेचे अध्यक्ष श्री. घुईखेडकर



व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफतांना प्रा. रासेकर



व्याख्यानमालेतील व्याख्यानाचा आस्वाद घेतांना
महाविद्यालयाचे विद्यार्थी



वाचन प्रेरणादिनानिमित्य पसायदानाचे सामुदायीक वाचन करतांना प्रा.आर. व्हि. इंगोले मॅडम



वाचन प्रेरणा दिनानिमित्य वर्तमानपत्रातील अग्रलेख वाचतांना एक विद्यार्थी



स्वाध्याय परिवारातील सदस्य पथनाट्य सादर करतांना



सिने कलाकार अनिल औव्हळ एकपात्री नाट्यप्रयोग सादर करतांना



सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवातील वादविवाद स्पर्धेत आपली बाजू मांडतांना महाविद्यालयाचा विद्यार्थी



युवा महोत्सवातील वादविवाद स्पर्धेत भाग घेतांना महाविद्यालयाचा विद्यार्थी



स्वयंशासन दिनानिमित्य डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतांना



डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतांना प्राचार्य डॉ. एन.एस.ठाकरे




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य
त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतांना प्रा.डॉ. जयवंत कांबळे



संत गाडगेबाबाच्या प्रतिमेला अभिवादन करतांना

**Cultural Committee Report 2017-18**



मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व
कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा जि. वाशिम

सांस्कृतिक समितीच्या
कार्याचा अहवाल

शैक्षणिक सत्र
२०१७-१८

सादरकर्ता
प्रा.डॉ. जयवंत निवृत्ती कांबळे
संयोजक, सांस्कृतिक समिती

सदस्य
प्रा. एस.पी. रिठे    प्रा. व्हि.आर. भगत    प्रा.संजय बोके

# सांस्कृतिक समितीच्या खर्चाचा तपशिल

शैक्षणिक सत्र :– २०१७–२०१८

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | गुणवंत विद्यार्थ्यांचा | :– | मोमेन्टो | ६,०००.००/– |
| | सत्कार | | प्रमाणपत्र | १,०००.००/– |
| २) | युवा महोत्सव | :– | गाडी भाडे(दोन ट्रीप) | ५,६००.००/– |
| | | | समुहगाण | ४,२००.००/– |
| | | | (वाद्यवृंदाचा खर्च) | |
| | | | लोक नृत्य | ३००.००/– |
| | | | नास्ता व चहा | ६००.००/– |
| | | | एन्ट्री फि | ९००.००/– |
| ३) | वक्तृत्व स्पर्धा | :– | गाडी भाडे | १००.००/– |
| | | | एन्ट्री फि | ४००.००/– |
| ४) | व्याख्यानमाला | :– | वक्त्याचे मानधन | ६,०००.००/– |
| | | | लाऊड स्पिकर भाडे | १,५००.००/– |
| | | | इतर किरकोळ खर्च | ५००.००/– |
| ५) | फोटो खरेदी | :– | सेवालाल महाराज | २००.००/– |
| | | | सावित्रीबाई फुले | २००.००/– |
| | | | राजमाता जिजाऊ | २००.००/– |
| ६) | पुष्पहार | :– | वर्षभराचा खर्च | ५००.००/– |
| | | | एकूण खर्च | २७,७००/– |

संयोजक

(प्रा.डॉ. जयवंत कांबळे)

# सांस्कृतिक समितीचे अंदाजपत्रक

शैक्षणिक सत्र :- २०१८-२०१९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार | :- | १०,०००.००/- |
| २) | युवा महोत्सव | :- | १५,०००.००/- |
| ३) | व्याख्यानमाला | :- | १२,०००.००/- |
| ४) | साऊंड सिस्टम | :- | ३,०००.००/- |
| ५) | फोटो पुष्पहार व इतर किरकोळ खर्च | :- | ५,०००.००/- |
| ६) | विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या | :- | ३,०००.००/- |
| ७) | चर्चासत्र | :- | ३,०००.००/- |
| ८) | निबंध स्पर्धा (तालुकास्तरीय) सहभागासाठीचा खर्च | :- | २,०००.००/- |
| | एकूण | | ५३,०००.००/- |

शैक्षणिक सत्र २०१८- १९ मध्ये सांस्कृतिक समितीच्यावतीने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रम व उपक्रमाला येणारा प्रस्तावित खर्च ६६,०००.००/- रुपये असून या खर्चाला मंजूरी द्यावी, हि विनंती.

स्थळ : मानोरा

दिनांक :- १९/०४/२०१८

संयोजक

(प्रा.डॉ. जयवंत कांबळे)

# सांस्कृतिक समितीच्या कार्यक्रम व उपक्रमाचे नियोजन

शैक्षणिक सत्र २०१८–१९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार (तालुकास्तर) | :– | २१ जुलै २०१८ |
| २) | निबंध स्पर्धा (तालुका स्तर) | :– | ३० ऑगस्ट २०१८ |
| ३) | स्वंयशासन | :– | ५ सप्टेंबर २०१८ |
| ४) | वाचन उपक्रम | :– | ६ डिसेंबर २०१८ |
| ५) | व्याख्यानमाला | :– | ४ जानेवारी २०१९ ते १२ जानेवारी २०१९ (मातृसप्ताह) |
| ६) | चर्चासत्र | :– | १९ फेब्रुवारी २०१९ |
| ७) | महापुरुषांच्या जयंतया व पुण्यतिथ्या | :– | प्रतिमा पुजन/अभिवादन |

याशिवाय महाराष्ट्र शासन, विद्यापीठ व विविध एन.जि.ओ. द्वारा निर्देशित करण्यात येणाऱ्या कार्यक्रम व उपक्रमाचे आयोजन करुन त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविला जाईल. त्याचप्रमाणे सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये सहभाग घेतला जाईल.

अशाप्रकारे शैक्षणिक सत्र २०१८–१९ मधील सांस्कृतिक समितीच्या विविध कार्यक्रम व उपक्रमाचे नियोजन सादर करण्यात येत आहे. तरी ते स्विकृत करुन मंजुरी द्याल, हि विनंती.

स्थळ :– मानोरा

दिनांक :– १९/०४/२०१८

सांस्कृतिक समिती,

संयोजक :– प्रा.डॉ. जयवंत कांबळे

सदस्य :– प्रा.एस.पि. रिठे

सदस्य :– प्रा. व्हि.आर. भगत

सदस्य :– प्रा. संजय वोके

# सांस्कृतिक समितीच्या कार्याचा आढावा

(शैक्षणिक सत्र २०१७–१८)

प्रति,

प्राचार्य साहेब,

मा.सु.पा. महाविद्यालय, मानोरा

विषय :– शैक्षणिक सत्र २०१७–१८ मध्ये सांस्कृतिक समितीने केलेल्या कार्याचा अहवाल सादर करणेबाबत.

सादरकर्ता :– प्रा.डॉ. जयवंत कांबळे
(संयोजक सांस्कृतिक समिती)

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती की, शैक्षणिक सत्र २०१७ – १८ मध्ये सांस्कृतिक समितीने खालीलप्रमाणे विविध कार्यक्रम व उपक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले आहे. त्याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## *१) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :–*

मागील १२ वर्षापासून मानोरा तालुक्यातील एस.एस.सी., एच.एस.सी., पदवी, एम.पी.एस.सी. व विविध स्पर्धा परिक्षेत विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समितीच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार सोहळा घेण्याचा उपक्रम सुरु आहे. शैक्षणिक सत्र २०१७–१८ मध्ये मा. अरविंदभाऊ इंगोले अध्यक्ष ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था मानोरा यांच्या हस्ते तालुक्यातील विविध परिक्षेत विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाला तालुक्यातील ८२ विद्यार्थी उपस्थित

होते. या सत्कार समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे हे सुध्दा उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. जयवंत कांबळे यांनी केले तर संचालन प्रा. एस.पि. रिठे यांनी केले. आभार प्रदर्शनाची जबाबदारी प्रा.व्हि. आर. भगत यांनी पार पाडली. प्रा. संजय बोके यांनी सुध्दा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

२) पथनाट्य –

माहे ऑगस्ट महिन्यामध्ये स्वाध्याय परिवाराच्या नाट्य कलावंतांनी महाविद्यालयामध्ये ''बेटी बचाव बेटी पढाव'' या विषयावर एक पथनाट्य सादर केले. या पथनाट्यामध्ये जवळ जवळ १५ कलावंताचा समावेश होता. पथनाट्य पाहण्यासाठी महाविद्यालयाचे ५०० विद्यार्थी उपस्थित होते.

३) स्वयंशासन दिन –

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून शिक्षक दिन हा स्वयं शासन दिन म्हणून महाविद्यालयामध्ये राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयाच्या तासिका घेतल्या. या उपक्रमामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या ४२ विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून भुमिका पार पाडली. वरिष्ठ महाविद्यालयातील तिन्ही विद्याशाखेच्या तासिक घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिक्षण समितीने परिक्षण करुन शाखानिहाय खालील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रमाणपत्रासाठी शिफारस करण्यात आली होती.

अ) कला शाखा :–

प्रथम :– कु. सोनु मधुकर चव्हाण, बि.ए.भाग ३

द्वितीय :– कु. शितल निरंजन खुपसे/
कु. शिवानी झिंगराजी उमरे, बि.ए. भाग २

तृतीय :– कु. मोहिनी सुरेश मुंडवाईक, बि.ए.भाग. ३

ब) वाणिज्य शाखा

प्रथम :- मुस्तकिम मकवानी, बि.कॉम. भाग १

द्वितीय :- रोशन हरीभाऊ बागडे, बि.कॉम. भाग ३

तृतीय :- कु. मयुरी ठाकरे, बि.कॉम. भाग १

क) विज्ञान शाखा

प्रथम :- योगेश ठाकरे, बि.एस.सी. भाग २

द्वितीय :- कु. संस्कृती पडघाण, बि.एस.सी. भाग ३

तृतीय :- कु. वैष्णवी इंगोले, बि.एस.सी. भाग ३

४) **संं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील सहभाग** –

२९ सप्टेंबर २०१६ मध्ये सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाअंतर्गत रायसोनी इंजिनियरिंग महाविद्यालय अमरावती या ठिकाणी युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी खालील events मध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

लोकनृत्य :- ०८

वक्तृत्व :- ०१

समुहगान :- ०६

एकूण १४ विद्यार्थ्यांनी वरिल events मध्ये भाग घेतला होता.

५) **सर्वांसाठी जिवनविद्या (कार्यशाळा)** –

दिनांक १८ सप्टेंबर २०१७ रोजी जिवनविद्या मिशन बोरीवली मुंबई येथील प्रचारकांनी महाविद्यालयामध्ये "सर्वांसाठी जिवन विद्या" या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेला वरिष्ठ महाविद्यालयातील ८१ विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेमधून समाजाचे अज्ञान, अंधश्रध्दा, निराशावाद व दैववाद नष्ट

करुन सुख, शांती, समाधान, सुयश, समृध्दी कशी प्राप्त करता येईल, अशा प्रकारचे विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

६) निबंध स्पर्धेतील सहभाग –

उपविभागीय पोलिस अधिकारी कारंजा लाड यांचे द्वारा आयोजित केलेल्या विविध विषयावरिल निबंध स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकूण ४१ विद्यार्थ्यांनी निबंध पाठविले होते. त्यापैकी कु. पुष्पा बाबाराव लवटे बि.ए.भाग १ या विद्यार्थीनींच्या ''ध्वनी प्रदुषण – दुष्परिणाम व उपाय'' या निबंधाला उपविभागातून दुसरा क्रमांक प्राप्त झाला.

७) व्याख्यानमाला –

महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती या कालावधीत मातृसप्ताह व्याख्यानमालेचे आयोजन करुन साजरा केला जातो. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना औपचारीक शिक्षणाबरोबरच त्यांचा बौध्दीक विकास होण्यासाठी तज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानमालेचे आयोजन मागील १२ वर्षापासून आयोजन केले होते.

शैक्षणिक सन २०१७–१८ मध्ये खालीलप्रमाणे व्याख्यानमाला संपन्न झाली.

दिनांक :– ०४ जानेवारी २०१८ व्याख्याते :– प्रा. घनशाम हरणे

विषय :– ''चला नवे जग घडवू या''

दिनांक :– ०८ जानेवारी २०१८

व्याख्याते :– प्रा.डॉ.स्मिता देशमुख,
श्री शिवाजी कला,वाणिज्य महा. अमरावती

विषय :– ''घे उंच भरारी''

दिनांक :– / /

व्याख्याते :– प्रा.डॉ. सुभाष गवई,
श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड

विषय :– ''समाज परिवर्तनाकरिता शिक्षण''

अशाप्रकारे तिन विषयावर वरिल तिन व्याख्यात्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर आपली अभ्यासपुर्ण व प्रभावी व्याख्याने दिली आहेत. या व्याख्यानमालेचा लाभ महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ शाखेतील ७०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या व्याख्यानमालेचे आयोजन सांस्कृतिक समितीने केले होते. व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस. ठाकरे, संयोजक प्रा.डॉ. जयवंत कांबळे, सदस्य प्रा. एस.पि.रिठे, प्रा.व्हि.आर. भगत व प्रा. संजय बोके यांनी परिश्रम घेतले.

८) महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या –

शैक्षणिक सत्र २०१७–१८ मध्ये सांस्कृतिक समितीच्या नियोजनामध्ये नमुद केलेल्या सर्व महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन साजऱ्या करण्यात आल्या आहेत. सुट्टीच्या कालावधीमध्ये आलेल्या काही जयंत्या व पुण्यतिथ्या संयोजक या नात्याने मी स्वतः महाविद्यालयामध्ये जाऊन साजऱ्या केल्या आहेत.

९) स्वच्छता वक्तृत्व करंडक स्पर्धा –

पं.स.मानोरा व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्यावतीने महाविद्यालयामध्ये तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन डिसेंबर २०१७ मध्ये करण्यात आले होते. हि स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन गटामध्ये घेण्यात आली होती. या स्पर्धेत महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र मिळाले.

| | |
|---|---|
| १) कु. निलांती नाजासाहेब राठोड | ५,०००/– रु. |
| २) कु. पुष्पा बाबाराव लवटे | ३,०००/– रु. |
| ३) कु. वैष्णवी चौधरी | २,०००/– रु. |
| एकूण | १०,०००/– |

रुपयांची बक्षीसे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पटकावली आहेत. अशाप्रकारे शैक्षणिक सत्र २०१७–१८ मध्ये सांस्कृतिक समितीने कार्य केले आहे. तरी हा अहवाल स्विकृत कराल, हि विनंती.

## विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांची संख्या दर्शविणारा तक्ता

(शैक्षणिक सत्र २०१७–१८)

| अ.क्र. | कार्यक्रम व उपक्रमाचे नांव | सहभागी वि. संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार (तालुकास्तर) | ८२ | |
| ०२ | पथनाट्य (बेटी बचाव, बेटी पढाव) | ५०० | |
| ३) | स्वयंशासन दिन | ४२ | अ) कला शाखा<br>प्रथम पुरस्कार :– कु. सोनु म. चव्हाण,बि.ए.३<br>द्वितीय पुरस्कार :– कु. शितल नि.खुपसे/ कु. शिवानी झि. उमरे, बि.ए.२<br>तृतीय पुरस्कार:कु.मोहिनी सु.मुंडवाईक,बि.ए. ३<br>ब) वाणिज्य शाखा<br>प्रथम पुरस्कार :– मुस्तकिम मकवानी, बि.कॉम.१<br>द्वितीय पुरस्कार :– रोशन ह. बागेड, बि.कॉम ३<br>तृतीय पुरस्कार :– कु. मयुरी ठाकरे, बि.कॉम १<br>क) विज्ञान शाखा<br>प्रथम पुरस्कार :– योगेश ठाकरे, बि.एस.सी. ३<br>द्वितीय पुरस्कार :– कु.संस्कृती पडघान, बि.एस.सी.३<br>तृतीय पुरस्कार :– कु. वैष्णवी इंगोले, बि.एस.सि.३ |

| अ.क्र. | कार्यक्रम व उपक्रमाचे नांव | सहभागी वि. संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| ४) | सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव | १४ | लोकनृत्य :-<br>वक्तृत्व :-<br>समुहगान :- |
| ५) | सर्वांसाठी जिवन विद्या (कार्यशाळा) | ८१ | |
| ६) | निबंध स्पर्धा (उपविभागीय पोलिस अधिकारी कारंजा लाड) | १४ | द्वितीय पुरस्कार :- कु. पुष्पा बा. लवटे बि.ए. भाग १ |
| ७) | व्याख्यानमाला (मातृसप्ताह) | ७०० | विद्यार्थ्यांच्या उद्बोधन व प्रबोधनासाठी महत्व पुर्ण उपक्रम |
| ८) | वक्तृत्व स्पर्धा (कामरगांव) | ०४ | |
| ९) | वक्तृत्व स्पर्धा (जिल्हास्तर) वाशिम | ०४ | |
| १०) | स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा | १२ | प्रथम पुरस्कार<br>द्वितीय पुरस्कार |
| ११) | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वाढदिवस साजरे करणे | | हेल्दी वातावरण निर्मितीसाठी उपयुक्त उपक्रम |



व्याख्यानमालेत मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. सुभाष गवई



व्याख्यानमालेचा लाभ घेतांना विद्यार्थी



व्याख्यानमाले दरम्यान विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतांना प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख




संत गाडगेबाबा जयंती



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्य

अभिवादन करतांना प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे



शिवजयंती



युवा महोत्सव सहभागी झालेली चमु






युवा महोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतांना



युवा महोत्सवातील सामुहिक नृत्यामधील सहभाग

लोकमत

# शिक्षणातून समाज परिवर्तन घडले पाहिजे!२

## डॉ.सुभाष गवई : मातृसप्ताह व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

मानोरा : शिक्षणातून स्वत्वाची जाणीव झाली पाहिजे. माणूस आदर्श बनला की समाज आदर्श बनेल. आपल्या विचारांना जातीवाद, धर्मवाद सांप्रदायिकतेची लागलेली कीड दूर करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सुभाष गवई यांनी केले. ते स्थानिक मातोश्री सुभद्राबाई पाटील कला विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मातृसप्ताह तीन



दिवसीय व्याख्यानमालेत बोलत होते. मातृसप्ताहामध्ये नामवंत वक्त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. चला नवे जग घडवू या हो उंच भरारी व समाज परिवर्तनासाठी शिक्षण या तीन विषयावर अनुक्रमे प्रा. घनश्याम हरणे, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख व प्राचार्य डॉ.सुभाष गवई यांचे व्याख्यान महाविद्यालयामध्ये संपन्न झाले. या व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

व्याख्यानमालेतील अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणातून निर्माण झालेल्या कौशल्याचा वापर स्वहितापेक्षा समाजहितासाठी करावा, अशा प्रकारचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले.

मातृसप्ताहाचे औचित्य साधून आयोजित केलेली तीन दिवसीय व्याख्यानमाला यशस्वी होण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक समितीच्या प्रा.डॉ. जयवंत कांबळे, प्रा.संजय रिठे, प्रा.व्ही.आर. भगत, प्रा. संजय वोके व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Hello Washim
Page No. 4 Jan 14, 2018
Powered by: erelego.com

## विद्यार्थ्यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

मानोरा : स्थानिक सुभद्राबाई पाटील कला विज्ञान व पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा येथे २१ जुलै रोजी तालुक्यातील १० वीच्या परिक्षेत ८० टक्के व १२ वीच्या परिक्षेत ७५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभाचे आयोजन केले आहे. मानोरा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त परिक्षा उत्तीर्ण केली असेल अशा विद्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार केला जाईल. तालुक्यातील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांनी अशा गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार समारंभात सहभागी होण्यासाठी पाठवावे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांची २० जुलैपर्यंत महाविद्यालयात नोंदणी करावी. विद्यालयाचे व कनिष्ठ महाविद्यालयांनी सहकार्य करण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.ठाकरे यांनी केले आहे.

## शुक्रवारला मासुपा महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

तालुका प्रतिनिधी /१९ जुलै

मानोरा : स्थानिक मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे महाविद्यालयात २५ जुलै रोजी एम.पी.एस.सी., दहावी व बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचा आयोजन करण्यात आले आहे. याकरीता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांनी गुण प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावाची नोंदणी महाविद्यालयात एक दिवसापूर्वी करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे यांनी केले आहे.

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात तालुक्यातील एम.पी.एस.सी.ची उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, तर १० वीच्या परिक्षेत ८० टक्के व १२ वीच्या परिक्षेत ७५ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा या सत्कार सोहळ्यात समावेश राहणार आहे. तरी तालुक्यातील सर्व विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयातील गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी २० जुलै रोजी गुरुवारपर्यंत सांस्कृतिक समितीचे महाविद्यालयाची मंडळी प्रा. जे.एन. कांबळे, प्रा. एस.पी. रिठे, प्रा.एस.व्ही. वोके यांच्याकडे करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. ठाकरे यांनी केले आहे.

## वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्या

# शिक्षणातून समाज परिवर्तन घडले पाहिजे-प्राचार्य डॉ.गवई



मानोरा/तालुका प्रतिनिधी

मानोरा येथील सुभद्राबाई पाटिल कला विज्ञान व के.पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा या ठिकाणी क्रांति ज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त मातृ सप्ताह तिन दिवशिय व्याख्यानमाला आयोजित करून साजरा करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये समाजाला दिशा देण्याचे महानकार्य करणाऱ्या सावित्रीबाई फुले व जिजाऊंचे विचार रूजवीत या उद्देशाने महाविद्यालयात व्याख्यानमालेचा कार्यक्रम सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातुन घेण्यात आला. व्याख्यान मालेतील तिसरे पुष्प गुंफतांना प्राचार्य डॉ. सुभाष गवई शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय कारंजा यांनी समाज परिवर्तनातून शिक्षण या विषयावर व्याख्यान देतांना शिक्षणातुन स्वत्वाची जाणिव झाली पाहिजे. माणूस आदर्श बनला की, समाज आदर्श बनेल आपल्या विचारांना, जातिवाद, धर्मवाद, सांप्रदायिकतेचे लागलेली किड दुर करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावि माध्यम आहे असे प्रतिपादन गवई यांनी केले. विद्यार्थी व शिक्षकासाठी उद्बोधक ठरलेल अशा विषयावर मातृसप्ताहामध्ये मायबोल वक्त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. चला नवे जग घडवू या, मै उंच भरारी व समाज परिवर्तनासाठी शिक्षण या तिन विषयावर अनुक्रमे प्रा. घनशाम दरणे, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख व प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचे व्याख्यान महाविद्यालयामध्ये संपन्न झाले.

या व्याख्यान मालेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. व्याख्यानमालेतिल अध्यक्षीय भाषणातुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणातुन निर्माण झालेल्या कौशल्याचा वापर स्वहितापेक्षा समाज हितासाठी करावा. अशा प्रकारचे विचार विद्यार्थ्यां समोर मांडले.

मातृसप्ताहाचे औचित्य साधुन आयोजीत केलेली तिन दिवशीय व्याख्यानमाला यशस्वी होण्याच्या दृष्टीने सांस्कृतीक समितीच्या प्रा. डॉ. जयवंत कावळे, प्रा. संजय रिठे, प्रा. व्हि. आर. भगत, प्रा. संजय बोके व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# महापुरुषांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांनी चालू ठेवण्याचे काम केले पाहीजे -स्मिता देशमुख

*प्रतिनिधी/* १२ जानेवारी

**मानोरा** : विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रामध्ये असल्या कर्तृत्वाने उंच भरारी घेण्याची पात्रता अंगी आणण्यासाठी कठोर परिश्रमाची आवश्यकता आहे. त्याच बरोबर देशाच्या उज्वल भवितव्यासाठी व सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे चालू ठेवण्याचे काम केले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. स्मिता देशमुख यांनी केले.

स्थानिक मा.सु.पा.कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त ८ जानेवारी रोजी आयोजित व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफतांना शिवाजी महाविद्यालय अमरावती येथील प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख बोलत होत्या.यावेळी मासुपा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांच्यासह सांस्कृतिक समितीचे सदस्य डॉ. जे. एन कावळे, प्रा. संजय रिठे, प्रा. व्ही. आर. भगत, प्रा. एस. ए. बोके यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मासुपा महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

मानोरा, ता. १९ : सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालयात शुक्रवारी (ता.२१) तालुक्यातील दहावीच्या परीक्षेत ८० टक्के व बारावीच्या परीक्षेत ७५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मानोरा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण केली असेल अशा विद्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार करण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील सर्व विद्यालयाचे व कनिष्ठ महाविद्यालयाने अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सत्कार समारंभात सहभागी होण्यासाठी पाठवावे. संपूर्ण गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी गुरुवार (ता.२०) पर्यंत महाविद्यालयात नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांनी केले आहे.

Cultural Committee Report 2018-19

# मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै.पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा जि. वाशिम

## सांस्कृतिक समितीच्या कार्याचा अहवाल

**शैक्षणिक सत्र २०१८ -१९**


* सादरकर्ता *

प्रा. डॉ. जयवंत निवृत्ती कांबळे

संयोजक सांस्कृतिक समिती

* सदस्य *

प्रा. एस पी रिठे, प्रा. व्ही आर भगत, प्रा. संजय चोके


April 2019

# सांस्कृतिक समितीच्या खर्चाचा तपशील
## शैक्षणिक सत्र २०१८-१९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ | मोमेंट | ६६०० |
| | | प्रमाणपत्र | १००० |
| २) | युवा महोत्सव | गाडी भाडे | ६००० |
| | | समूहगान | २५ ०० |
| | | नाश्ता व चहा | ७०० |
| | | प्रवेश फी | ११०० |
| ३) | व्याख्यानमाला | वक्त्याचे मानधन | ६००० |
| | | इतर किरकोळ खर्च | २००० |
| ४) | वक्तृत्व व इतर स्पर्धेतील सहभाग | प्रवास खर्च | २००० |
| ५) | पुष्पहार व पुष्पगुच्छ | वर्षभराचा खर्च | १००० |
| | | एकूण खर्च | ३१,४०० |

April 2019

# सांस्कृतिक समितीचे अंदाजपत्रक
## शैक्षणिक सत्र २०१९ – २०२०

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार | :– | १०,००० |
| २) | युवा महोत्सव | :– | १५,००० |
| ३) | व्याख्यानमाला | :– | १२,००० |
| ४) | पुष्पहार व पुष्पगुच्छ व इतर किरकोळ खर्च | :– | २,००० |
| ५) | विविध स्पर्धेतील सहभागी होण्यासाठी चा खर्च | :– | ३,००० |
| ६) | विविध कार्यक्रमाचे आयोजनाचा खर्च | :– | ५,००० |
| | एकूण प्रस्तावित खर्च | :– | ४७,००० |

